19 DEC 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात देशाच्या संस्कृतीचे दर्शन

## तरुणाईने सादर केल्या विविध प्रांतातील नृत्यकला

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठामध्ये देशभरातील तरुणाई एकवटली आहे. ही तरुणाई आपआपल्या प्रांतातील नृत्यकला सादर करत असून अन्य विद्यापीठातील विद्यार्थी इतर प्रांतातील नृत्य शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. यानिमित्ताने देशाच्या संस्कृतीचेच दर्शन विद्यापीठात होत आहे.

राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय, युवा आणि खेल मंत्रालय, भारत सरकार व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठामध्ये दि. १५ पासून राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये महाराष्ट्रसह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, तामिळनाडू, पदुच्चेरी, केरळ, राजस्थान, आसाम, गोवा या विविध राज्यातील विद्यापीठाचे संघ सहभागी झाले आहेत. या राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये शिवाजी विद्यापीठातर्फे देशभरातून आलेल्या तरुणाईसाठी भरगच्च कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. दिवसभरात विविध विषयांवरील व्याख्याने आणि स्पर्धा तर सायंकाळच्या सत्रामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जात आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विविध प्रांतातील नृत्यांचे सादरीकरण करण्यात येत आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी पोवाडा तर विद्यार्थिनींनी लावणीचे सादरीकरण केले. लावणीच्या अदाकारींनी देशभरातून आलेले विद्यार्थी भारावून गेले. लावणीविषयी ऐकले असले तरी प्रत्यक्ष सादरीकरण होताना पाहिले नव्हते. त्यामुळे लावणी आणि तिचा इतिहास आणि प्रकारांविषयी इतर प्रांतातून आलेले विद्यार्थी माहिती घेत होते. तर पदुचरी आणि आंध्र प्रदेश येथून आलेल्या विद्यार्थ्यांनी सादरीकरण केलेल्या नृत्याची माहिती घेण्याची उत्सुकता होती. आसाम, त्रिपुरा आदी पूर्वोत्तर राज्यांतून आलेल्या विद्यार्थ्यांचे नृत्य सादरीकरणाची माहिती

▸▸ पान २ वर






कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये विविध कला सादर करताना विद्यार्थी. (सर्व छाया : एस. अली)



वैयक्तिक नृत्य सादरीकरणाने विद्यार्थ्यांनी रसिकांची मने जिंकली.

### इतर नृत्य प्रकार शिकण्याचा प्रयत्न



एनएसएसच्या एकात्मता शिबिरामध्ये सहभागी होण्याची ही पहिलीच वेळ आहे. या शिबिरामुळे कोल्हापूरसह संपूर्ण देशाची भाषा, इतिहास, संस्कृती जवळून अनुभवायास मिळत आहे. सांस्कृतिक कार्यक्रमावेळी पारंपरिक नृत्य सादर केले. त्याला इतर विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. मलासुद्धा इतर काही राज्यातील नृत्य प्रकार फार आवडले, ते आत्मसात करण्याचा प्रयत्न करत आहे.

– गंगा शर्मा, राजस्थान

### विविधतेतून एकता निर्माण करणारा मंच



आपला देश विविधतेने नटलेला देश आहे. एनएसएसतर्फे आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबिरातून विद्यार्थ्यांना विविधतेतून एकतेची भावना निर्माण करणारा मंच उपलब्ध झाला आहे. येथे सादर झालेले नृत्य प्रकार आणि स्त्री-पुरुष एकात्मता, ध्येय निश्चिती, युवा नेतृत्व आदी विषयावरील व्याख्याने प्रभावित करणारी ठरली. तसेच कोल्हापूरमधील श्री अंबाबाई मंदिर आणि संग्रहालय पाहून भारावून आम्ही गेलो.

– सुदीप्ता रॉय, आसाम

### नव्या संस्कृती अवगत




देशाच्या विविधतेतील एकता एकत्र यावी तसेच विविध प्रांतातील भाषा संस्कृती एकत्र व्हावी यासाठी एनएसएस अशा शिबिरांचे आयोजन करत असते. या शिबिराच्या माध्यमातून हा हेतू साध्य होत आहे, असेच म्हणावे लागेल. शिबिराच्या कालावधीत देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या संस्कृतीशी अवगत होण्याची संधी मिळत आहे. अनेक नृत्य प्रकार पहिल्यांदाच अनुभवता आले.

– प्रिन्स तिवारी, गुजरात

# विद्यापीठात देशाच्या संस्कृतीचे दर्शन


इतर विद्यार्थी घेत होते. गुजरात आणि राजस्थान प्रांतातून आलेल्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक रास गरबा असे नृत्य प्रकार सादर केले जात आहेत. गोव्यातून आलेल्या विद्यार्थ्यांकडून पारंपरिक नृत्यांबरोबर पाश्चात्य पद्धतीचे नृत्य प्रकार सादर केले जाणार आहेत. त्यांच्या तालावर देशभरातून आलेली तरुणाई ताल धरत आहे. नियमित कार्यक्रम आणि कार्यक्रमांच्या नियोजनानुसार विविध कार्यक्रम या शिबिरार्थींमधून शनिवारपर्यंत सादर केले जाणार आहे. या नृत्य प्रकारांतून संपूर्ण देशाच्या सांस्कृतिक एकतेचे दर्शन घडत आहे.



## विविध नृत्यांची मोहिनी

एनएसएसच्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरात सहभागी होण्याची ही पहिलीच वेळ आहे. सुरुवातीला इतर प्रांतातून आलेल्या विद्यार्थ्यांशी बोलताना भाषेची अडचण होती, आता मात्र ती अडचण जाणवत नाही. अनेक नवे मित्र-मैत्रिणी मिळाल्या आहेत. सांस्कृतिक कार्याक्रमांमध्ये लावणीचे सादरीकरण केले. त्याच बरोबर इतर प्रांतातील नृत्य प्रकारांनी मोहिनी घातली असून ते शिकण्याचा प्रयत्न करत आहे.

– **श्रुती जाधव,** शिवाजी युनिव्हर्सिटी



## इतिहासाने प्रभावित

या शिबिरामुळे कोल्हापूरसारख्या समृद्ध शहराला भेट देता आली, याचा आनंद आहे. शिवाजी विद्यापीठातील वातावरण अतिशय प्रफुल्लित करणारे आहे. शिबिरादरम्यान पन्हाळा, रंकाळा, येथील वस्तूसंग्रहालयांना भेट दिली. त्यामुळे येथील इतिहास, परंपरांची माहिती मिळाली. शिबिराच्या पुढील काळात छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहे. – **ए. व्ही. रामाराव,** आंध्र प्रदेश

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2018
तरुण भारत



कोल्हापूर : कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय एकात्मता शिबिरात लोकनृत्य सादर करताना त्रिपुराचा संघ.

# लोकनृत्याच्या तालावर तरुणाईने धरला ठेका

प्रतिनिधी
कोल्हापूर

राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या चौथ्या दिवशी पाच राज्यातील लोकनृत्यांचा अविष्कार पाहावयास मिळाला. या लोकनृत्याच्या तालावर उपस्थित तरुणांनी ठेका धरला. त्रिपुरा विद्यापीठाने सादर केलेल्या लोकनृत्याने उपस्थितांची मने जिंकली, प्रेक्षकांनीही उत्स्फूर्त दाद दिली.

शिवाजी विद्यापीठात गेल्या चार दिवसांपासून राष्ट्रीय एकात्मता शिबिर सुरू आहे. शिबिराच्या चौथ्या दिवशी तेलंगणा, गुजरात, कर्नाटक, केरळसह महाराष्ट्र या पाच राज्यातील संघांनी लोकनृत्यांचे सादरीकरण केले. लोकसंस्कृतीची देवाण-घेवाण करीत पारंपरिक लोकनृत्ये, लोकगीते पुढच्या पिढीपर्यंत पोहचण्यास मदत होत आहे. सकाळी ६ वाजता योग शिबिराने सुरुवात झाली. प्राचार्य डॉ. सुधीर इंगळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा ५० वर्षांचा इतिहास सांगितला. डॉ. भारती पाटील यांनी 'स्त्री-पुरूष समानता" विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. एस. डी. पाटील म्हणाले, विद्यार्थी दशेतच आपल्या कलागुणांना वाव देत व्यक्तीमत्व विकास साधला पाहिजे.

**चौथ्या दिवशी योग शिबिर, स्टेज शो, व्याख्यान, नाटिका सादर**

स्टेज शो व नाटिका स्पर्धांमध्ये ११ राज्यातील संघांनी सहभाग नोंदविला. परीक्षक म्हणून डॉ. अरुण बाळकृष्णा (केरळ), डॉ. अंकुश दळवी (महाराष्ट्र), डॉ. हर्षता (कर्नाटक) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. श्रुती पाटील, प्रा. पी. आर. माळी, सलमान खान (औरंगाबाद) यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. आर. एस. लोखंडे यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ शिक्षणशास्त्र अधिविभाग आणि महात्मा गांधी ग्रामीण शिक्षण परिषद व केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय यांच्या वतीने शिक्षणशास्त्र पदवी व पदव्युत्तर शिक्षकांसाठी दहादिवसीय कार्यशाळा सुरू आहे. शालेय आणि शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमातील नयी तालीम, अनुभवाधिष्ठित शिक्षण आणि कार्य शिक्षण या विषयांवर कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

महात्मा गांधी यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमामध्ये कशाप्रकारे समावेश करण्यात येईल. कार्यशाळाचे उद्घाटन शिक्षणशास्त्र अभ्यासमंडळाच्या अध्यक्षा डॉ. शोभा काळेबाग यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राध्यापक डॉ. पी. एस. पाटणकर होते. समन्वयक म्हणून डॉ. विद्यानंद खंडागळे काम पाहात आहेत.